# मिरा भाईंदर महानगरपालिका

**इतिवृत्त**

जा.क्र.मनपा/पर्यावरण/२३/2021-22
दि.१० /02/२०२२

विषय :- १५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त अनुदानातुन "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्याबाबत गठीत केलेल्या समितीची दि. २८/०१/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेली बैठक.

१५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त अनुदानातुन स्वच्छ हवा कृती आराखडा राबविण्याबाबत गठीत केलेल्या समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी वर्ग उपस्थित होता.

| अ.क्र. | अधिका-यांचे पद | समिती |
|---|---|---|
| १. | मा. आयुक्त | अध्यक्ष |
| २. | शहर अभियंता | सदस्य |
| ३. | उप-आयुक्त, पर्यावरण | सदस्य |
| ४. | उप-आयुक्त, घनकचरा | सदस्य |
| ५. | कार्यकारी अभियंता (बांधकाम) | सदस्य |
| ६. | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | सदस्य |
| ७. | सहाय्यक आयुक्त, पर्यावरण | सदस्य सचिव |

सदर बैठकीत १५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त निधी करीता २०२१-२२ मध्ये २१ कोटी खर्च करुन हवेची गुणवत्ता सुधारणेकरीता महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी वर्गाकडुन सविस्तर आढावा घेऊन परिशिष्ठ "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे निधी खर्च करणेची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

| अ. क्र. | मुद्दा | विभागाकडुन सादर करण्यात आलेली माहिती | अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये मध्ये) | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | इलेक्ट्रीक बस खरेदी | ११ बस (पैकी एक मिनी बस) | ८ कोटी | परिवहन |
| २. | EV चार्जिंग स्टेशन | २ ठिकाणी | १ कोटी | विद्युत |
| ३. | धुळ प्रदुषण नियंत्रण मशिन (Mist Spray Machine), (Tander Jet Spray) | १ नग | २ कोटी | पर्यावरण |
| ४. | C.Q.M.S. (हवा प्रदुषण नियंत्रण यंत्रणा) | १ नग | १.५ कोटी | पर्यावरण |
| ५. | Horticulture Compost Plant (झाडांच्या फांद्या / पालापाचोळा पासून खत निर्मिती) | १ नग | १ कोटी | उद्यान व वृक्षप्राधिकरण / पर्यावरण |
| ६. | शहरातील प्रदुषण चाचणीसाठी फिरती प्रयोगशाळा खरेदी करणे. (तांत्रिक मनुष्यबळासह), (Mobile Laboratory) | १ नग | २.५ कोटी | पर्यावरण |
| ७. | सोलार प्लॅन्ट | १ नग | १.५ कोटी | सार्व.बांधकाम |
| ८. | स्क्रबर (स्मशानभुमी) | १ नग | १.२ कोटी | सार्व.बांधकाम |
| ९. | सायकल ट्रॅक | १ नग | ५० लाख | सार्व.बांधकाम |
| १०. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अधिका-यांसाठी E-कार खरेदी. | ५ नग | १ कोटी | वाहन |
| ११. | शहरात विविध चौक सुशोभिकरण / हिरवळ / पाण्याचे कारंजे निर्माण करणे. | | १.७० कोटी | पर्यावरण/ उद्यान व वृक्षप्राधिकरण |
| | | एकुण | | |

महत्वाचे :-

१. उपरोक्तप्रमाणे बैठकीस दिलेल्या निर्देशानुसार ज्या विभागामार्फत संबंधित कामे करावयाची आहेत. त्या विभागांनी संबंधित कामाबाबतचे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्याची उचित कार्यवाही सोमवार, दि. २८/०२/२०२२ पर्यंत पुर्ण करावी.

२. उपरोक्तप्रमाणे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतर तात्काळ संबंधित कामांची निविदा प्रपत्रे तयार करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
अध्यक्ष